Publication: Tarun Bharat
Date: 5/5/2019
Page: 2
Column: 5-7

तरुण भारत संवाद
रविवार दि. ५ मे २०१९

# गोराईतील आदिवासी पाडे उजळले

प्रतिनिधी
मुंबई

कित्येक वर्षांपासून आपल्याकडेही विजेचा प्रकाश येईल या प्रतिक्षेत असलेल्या गोराई येथील आदिवासी गावातील कुटुंबे शुक्रवारी रात्री एकत्र आनंदाच्या प्रकाशात न्हाऊन निघाली. कारण, त्यांच्या गावात ७० वर्षांच्या प्रतिक्षेनंतर वीजपुरवठा सुरू झाला. अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबई लि. (एईएमएल) या शहरातील सर्वात मोठ्या वीज पुरवठा कंपनीने झामजड पाड्यात वायरी टाकण्याचे काम सुरू केले होते ते या आठवड्यात पूर्ण झाले.

३ मे रोजी पहिल्यांदा इथे विजेचा दिवा सुरू झाला, तेव्हा ग्रमस्थांनी एकत्र येत नाचत गात हा आनंद साजरा केला. एईएमएलने वायरी टाकण्याचे काम सुरू केल्यापासून आपली घरेही प्रकाशात उजळून निघण्याची प्रतिक्षा करणारी लहान मुलेही मोठ्यांइतकीच आनंदली होती.





**विजेचा प्रकाश अंगणात आल्यानंतर आदीवासी महिलांनी एकत्रित येऊन आनंदोत्सव साजरा केला.**

याप्रसंगी एईएमएलचे प्रवक्ता म्हणाले, आम्ही गोराईतील झामजड पाडा येथील विजेचे काम पूर्ण केले आहे. गावातील कुटुंबांनी घेतलेल्या प्रयत्नांमुळे आम्ही हे काम पूर्ण करू शकलो. आपली घरे प्रकाशाने उजळलेली पाहताना या ग्रामस्थांच्या चेहऱ्यावर आलेली झळाळी पाहणे हा अत्यंत समाधानकारक अनुभव होता. एक ग्राहककेंद्री संस्था म्हणून आमच्या सर्व ग्राहकांना अखंडित वीजपुरवठा मिळेल, यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्न करू.